# बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे एप्रिल २०११

## गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई. गु.र.क्र. ४५/११ कलम ४५२, ३०२, ३८७, ३४ भादवि सह ३,२५ भा.ह.का. सह ३(१)(i)३(२), ३(४), एमसीओसी. (दा.नौ.नगर पो. ठाणे गु.र.क्र.११६/२०११)

१) गु.र.क्र व कलम — गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.र.क्र. ४५/११ कलम ४५२, ३०२, ३८७, ३४ भादवि सह ३,२५ भा.ह.का. सह ३(१)(i)३(२), ३(४), एमसीओसी. (दा.नौ.नगर पो. ठाणे गु.र.क्र.११६/२०११)

२) गु.घ.दि व वेळ — दिंनाक १४.०३.११ रोजी ११.३० वा सुमारास

३) गु.दा.दि. व वेळ — दिनांक १४.०३.११ रोजी १२.०५ वा

४) गुन्हा उघडकीस — दिनांक १२.०४.११

५) फिर्यादी — मोमिंद सोहब मुसा शेख वय ४८ वर्षे

६) मयत — योगेश मधुर सुळे वय २९ वर्षे व सम्राट श्रीकांत देवार्षी (दोघेही साईट इंजिनिअर)

७) आरोपी अटक — १) राजु लक्ष्मण जाधव वय ३२ वर्षे,
२) योगेश शांताराम वाघमारे वय २७ वर्षे,
३) ख्वाजप्पा विठ्ठल नागोरे वय २८ वर्षे,
४) मोहसीन वली मोहम्मद खान वय ४२ वर्षे

**गुन्हयाची थोडक्यात हकिगत** — प्रस्तृत गुन्हयाची हकीगत अशी आहे की, दिनांक १४/०३/२०११ रोजी सकाळी ११.३० वाजताचे दरम्यान सहाना ग्रुप ॲण्ड डेव्हलपर्स यांचे सिझर रोड, आंबोली चर्च जवळ, अंधेरी (पश्चिम) मुंबई येथील बांधकाचे जागेवरील कार्यालयात दोन अज्ञात इसम इसमांनी प्रवेश करून तेथील साईट इंजिनिअर योगेश मधुर सुळे, वय २९ वर्षे व सम्राट श्रीकांत देवार्षी वय २८ वर्षे यांच्यावर अतिशय जवळून गोळीबार करून दोघांचा निर्घृण खुन केला. सदर ठिकाणी रवी पुजारी याचा दुरध्वनी क्रमांकाची चिठ्ठी असलेला लिपाफा सोडला होता. सदरबाबत गु.प्र.शा गु.र.क्र ४५/११ कलम ४५२, ३०२, ३८७, ३४ भादवि सह ३,२५ भा.ह.का. सह ३(१)(i)३(२), ३(४), एमसीओसी (दा.नौ.नगर पो. ठाणे गु.र. क्र. ११६/२०११) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच यापुर्वी दिनांक २८.०२.११ रोजी वाशी नवी मुंबई येथील शहा डेव्हलपर्स या बांधकाम व्यावसायिकांच्या

कार्यालयात अशाच प्रकारे गोळीबाराची घटना घडली होती सदर घटनेमध्ये साईट इंजिनिअर संजय फाटक वय ३५ वर्षे हा गोळीबारात जखमी झाला होता.

सदरचे दोन्ही गुन्हे रवी पुजारी टोळीने बांधकाम व्यवसायिकांमध्ये दहशत बसवून खंडणी वसूल करण्याकरीता केले होते म्हणून सदर दोन्ही गुन्हयांची गांभीर्याने दखल घेत मा. सह पोलीस आयुक्त (गुन्हे), मुंबई यांनी गुन्हे उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते.

मालमत्ता कक्षाचे पोलीस पथकास दिनांक १२/०४/२०११ रोजी राऊत बार ॲण्ड रेस्टॉरंट, रबाळे नवीमुंबई या ठिकाणी रवी पुजारी टोळीचे अंधेरी व वाशी येथील गोळीबाराच्या घटनेत सहभागी असलेले काही सदस्य हे एकत्र जमणार आहेत अशी माहिती मिळाल्यावरून मालमत्ता कक्ष व कक्ष–६ गु.प्र.शा. च्या अधिकारी व अंमलदारांनी सदर ठिकाणी सापळा रचुन **आरोपी १) राजु लक्ष्मण जाधव वय ३२ वर्षे, २) योगेश शांताराम वाघमारे वय २७ वर्षे, ३) ख्वाजप्पा विठ्ठल नागोरे वय २८ वर्षे, ४) मोहसीन वली मोहम्मद खान वय ४२ वर्षे** यांना अटक करुन **त्याचेकडून एक ९ एम एम पिस्तुल, एक .३२ रिव्हॉल्वर व ४ जीवत काडतुसे, १ रिकामी पुगंळी, ४ मोबाईल फोन तसेच नमुद गुन्हा करण्याकरीता मोबदला म्हणून प्राप्त झालेली रोख रक्कम रुपये ३०,०००/– हस्तगत करण्यात आली आहे.**

मालमता कक्ष व कक्ष–६ गुन्हे प्रकटीकरण शाखा मुंबईच्या नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायिक कस लावून सदरच्या अतिशय कठिण व किचकट गुन्हयाची उकल केल्याने मा.पोलीस आयुक्तांनी त्यांना एप्रिल २०११ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ठ गुन्हेशोधाचे पारितोषिक जाहिर केले आहे.

**तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांची नावे....**

१) पो.नि. अरुण चव्हाण/मालमत्ता कक्ष, गु प्र.शा

२) पो.नि. श्रीपाद काळे/कक्ष–६, गु.प्र.शा

३) पो.नि. शैलेश पासलवार/मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा

४) स.पो.नि. नंदकुमार गोपाळे/मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा

५) पो.ना.क्र २५१७०/मदने, मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा

६) पो.ना.क्र ९७५३/घोसाळकर, कक्ष–६, गु.प्र.शा

७) पो.शि.क्र ९८०१२६/सावंत, मालमत्ता कक्ष, गु.प्र.शा

८) पो.शि.क्र २९४०३/परब, कक्ष–६, गु.प्र.शा

९) पो.शि.क्र ३३१२८/सुर्वे कक्ष–६, गु.प्र.शा

१०) पो.शि.चा.क्र ९६१७५७/रिळकर मो.प.विभाग कक्ष–६ चेबुर.